# एकविसावे शतक आणि मराठी साहित्य

**डॉ. मनोहर नाईक**
*प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय*
*नागपूर*

एकविसावे शतक अतिशय गतिमान आहे. ही गती प्रगतीचे पंख लावून कल्पनेच्याही पल्याड नेणारी आहे! गती हा निसर्गाचा नियम आहे. आणि प्रगती हेच मानवाचे खरे जीवन आहे. निसर्ग नियमानुसार मानवाने प्रगती केलीच पाहिजे. परंतु या प्रगतीची गती संतुलित, संयमित व नियंत्रितही असली पाहिजे. अलीकडच्या अनियंत्रित गतीने एकूणच जग असंतुलित होऊ लागले आहे. या वेगवान गतीने मनुष्यजीवनाला भोवळ येऊ लागली आहे. या अती गतिमुळे मनुष्य नीती गमावून बसतो की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. एकूण जगच विनाशाच्या दुष्टचक्रात अडकते की काय? असे सामाजिक पर्यावरण आकारास येऊ लागले आहे. माणसांपेक्षा यंत्रांना, भौतिक साधनांना अधिक महत्त्व येऊ लागले आहे. चैनीच्या वस्तुंनी बाजारपेठा ओसंडून वाहू लागल्या आहेत. माणूस चंगळवादी होऊ लागला आहे. भौतिक सुखात लोळू लागला आहे. माणूस माणसांपेक्षा भौतिक साधनांत रमू लागला आहे. माणसाची नाविन्याची हौस फार वाढली आहे. रोज नवनवीन व अद्ययावत उत्पादने बाजारात येवू लागली आहेत.काल खरेदी केलेली वस्तू आज जुनी वाटू लागली आहे. मानवाजवळ संवादाची व संपर्काची अतिजलद, अत्याधुनिक व अद्ययावत साधनं आली आहेत. ग्लोबल व्हिलेजच्या नावाखाली माणूस या संपर्क यंत्रणेमुळे अतिशय जवळ आला आहे. परंतु मनाने परस्परांपासून दुरावत चालला आहे. परस्परांत जिवघेणी स्पर्धा वाढली आहे. जगात एका बाजूला डोळे दिपवून टाकणारी श्रीमंती वाढत आहे. तर दुसऱ्या बाजूला अस्वस्थ करणारा कंगालपणा वाढू लागला आहे. जल, जंगल व जमिनीवर कब्जा करून प्रस्थापित वर्ग अधिक धनाढ्य होवू लागला आहे. त्यामुळे कष्टकरी, शेतकरी वर्ग विस्थापित होण्याच्या मार्गावर आहे. विकासाच्या नावावर वसुंधरेला भकास करणे सुरू आहे.जगात श्रीमंत होण्याची किळसवाणी स्पर्धा वाढीस लागली आहे. तिकडे फोर्ब्सच्या यादीत श्रीमंतांची नावं झळकतात .आणि इकडे दारिद्र्याच्या रेषेखालील गडद अंधारात असंख्य जीव अन्नासाठी तडफडतात. जगातील धान्याच्या वखारींत लाखो टन धान्य सडतं. त्याचवेळी अन्नाविना अनेकांचं मरण तडफडतं.

एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक आहे. जगातील बहुतेक राष्ट्रांनी मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाउजा) या भांडवलवादी विचारसरणीने जगातीलअनेक राष्ट्रांना आकर्षित केले आहे. झटपट प्रगतीच्या हव्यासापायी अनेक राष्ट्रे भांडवलवादाच्या विषारी विळख्यात सापडली आहेत. या विषारी विळख्यामुळे सर्वंकष समतेचा व लोकशाही शासनप्रणालीचा जीव गुदमरू लागला आहे. सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अस्थिर, अनिश्चित व असुरक्षित झाले आहे. कामगारांचे शोषण आणि कामगार चळवळींचे दमन केले जात आहे. कामगार हा उद्योगविश्वाचा कणा आहे.परंतु तोच आज दीनवाणा झाला आहे.भांडवलदार कामगारांच्या घामातूनच झगमगीत विश्व उभारत आहेत.आणि त्यांनाच अडगळीत टाकत आहेत.

स्पर्धेलाच प्रगती असे गोंडस नाव दिल्यामुळे स्पर्धा अधिक धारदार, टोकदार व धोकादायक झाली आहे. स्पर्धेत गळाकापू प्रवृत्ती बळावली आहे. राष्ट्र-राष्ट्रांवरील व व्यक्ती-व्यक्तींवरील विश्वास गमावू लागला आहे. त्यामुळे बहुतेक राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा वाढीस लागली आहे . अत्याधुनिक व अद्ययावत शस्त्र निर्मितीसाठी संशोधनं केली जात आहेत. नवनवीन तंत्रज्ञान वापरले जात आहे.एकूणच जगात व मनुष्य जीवनात स्पर्धा, ताणतणाव,भिती व असुरक्षितता वाढत आहे. या सगळ्या दबावयुक्त पर्यावरणाचा परिणाम राष्ट्रजीवनावर, समाजजीवनावर, कुटुंबजीवनावर व व्यक्तिजीवनावरही होतो आहे.

आधुनिक जीवन पद्धतीनुसार धर्म कालबाह्य व्हायला हवा होता.परंतु सत्ता प्राप्तीसाठी, सर्वंकष शोषणासाठी व वर्चस्व स्थापित करण्यासाठी धर्माचा विकृत पद्धतीने वापर होवू लागला आहे. जगावर वर्चस्व स्थापित करण्याची काही राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू झाली आहे.या अतिरेकी स्पर्धेमुळे जगात युद्धजन्य स्थिती निर्माण झाली आहे. अनेक देशातील सत्ताप्रमुखांनी सत्तेचा गैरवापर करून

एकाधिकारशाही स्थापित केली आहे. त्यातून हुकुमशाहीची भीती डोकावू लागली आहे. जग पुन्हा हिटलरशाहीच्या विषारी विळख्यात सापडते की काय ? अशी शंका डोके वर काढते आहे. सत्तेतून पैसा मिळवायचाआणि पैशातून सत्ता स्थापन करायची. अशी भ्रष्ट प्रवृत्ती राजकारणावर स्वार झाली आहे. अनेक देशाची राजकीय सत्तासूत्रे ही धनाढ्य व्यक्तींच्या अथवा धनाढ्य राजकीय पक्षांच्या ताब्यात आहेत. अनेक देशातील लोकशाही भांडवलदारांची बटिक झाली आहे. भांडवलदारांनी राजकीय पुढाऱ्यांना अंकित करून लोकशाहीवर ताबा मिळवला आहे.भूगर्भातील अमूल्य खनिजसाठे मिळवण्यासाठी पृथ्वीचे बेसुमार उत्खनन सुरू आहे. वाहतुकीचे जाळे विणण्यासाठी आणि गगनचुंबी इमारती उभारण्यासाठी जंगलांचे उद्‌ध्वस्तीकरण केले जात आहे. अणुचाचण्यांनी पृथ्वीला खिळखिळे करणे सुरू आहे.विषारी वायुचे व द्रव्यांचे उत्सर्जन करणारे असंख्य कारखाने मोठ्या प्रमाणात उभारले जात आहेत. त्यामुळे जलचर प्राण्यांचे,तसेच पृथ्वीवरील जीवसृष्टीचे जीवन धोक्यात आले आहे. मानवाच्या ओरबाडून घेण्याच्या व अतिरेकी हव्यासाच्या विनाशक प्रवृत्तीमुळे पृथ्वीचे भौगोलिक संतुलन बिघडू लागले आहे.पृथ्वीचे तापमान वाढू लागले आहे.जगातील अनेक ठिकाणी हिमशिखरे वितळू लागली आहेत.अनेक ठिकाणी भूस्खलन होवू लागले आहे.ढगफुटीसारख्या घटना वाढू लागल्या आहेत.महापूर येवू लागले आहेत. कधी कोरड्या दुष्काळाच्या झळांनी जीवन होरपळून निघत आहे. समुद्र किनाऱ्यावरील महानगरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. एकविसाव्या शतकातील या वैश्विक घडामोडींचा परिणाम जगातील एकूणच मानवी समाजजीवनावर होवू लागला आहे. या भोवळ आणणाऱ्या बदलाने जीवनाचा तळ ढवळून काढला आहे. जीवनात अपरिहार्य अशी उलथापालथ होवू लागली आहे. संथ जीवनात अनेक लाटा, लहरी उसळू लागल्या आहेत.कलाविश्वाच्या व साहित्यजगताच्या किनाऱ्यांवर या लाटा धडकू लागल्या आहेत. कलावंतांच्या आणि प्रतिभावंतांच्या संवेदनशील मन:पटलावर या अपरिहार्य बदलांचे तरंग उमटू लागले आहेत. या लाटा-लहरींची स्पंदने ते आपल्या कलेतून आणि साहित्यातून सूक्ष्मपणे टिपू लागले आहेत.जगाच्या नकाशावरील सर्व देशांतील व भाषांतील साहित्यात एकविसाव्या शतकातील गतिमानतेचे प्रतिबिंब उमटू लागले आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात या गतिमानतेचे बरेवाईट परिणाम अधिक स्पष्ट स्वरुपात दिसणे स्वाभाविक आहे. भारतात अजूनही अनेक धर्म, वर्ण, जाती, पंथ समाजमनाला चिकटून बसले आहेत. येथे आजही अनेक चाली, रिती, रुढी, प्रथा, परंपरा, अनेक भाषा, पेहराव, श्रद्धास्थाने, भिन्नभिन्न संस्कृती अस्तित्वात आहे. धर्मश्रद्ध मन अजूनही पारंपरिक आजारातून पूर्णपणे बरे झालेले नाही. त्यातच या एकविसाव्या शतकाची गतिमानता येवून धडकली आहे.भारतीय समाजमन अतिशय विचित्र आहे. या मनाला स्थितिशील पौराणिकताही हवी आहे; आणि गतिमान आधुनिकताही हवी आहे. या मनाला पुरातन काळातील सनातन अंधारही प्रिय आहे. आणि आधुनिक युगातील नेत्रदीपक झगमगाटही पाहिजे आहे. असे हे दोलायमान मन आहे. या समाजमनाला पुरातन काळातील रानटीपणही पाहिजे आहे. आणि विज्ञानयुगातील अद्ययावत सुविधाही हव्या आहेत. भारतीय समाजमन हे अंतर्विरोधग्रस्त मन आहे. त्यामुळेच एकविसाव्या शतकातील गतिमानतेने भारतीय समाजमनातील आचार-विचारांचा गुंता आणखी वाढविला आहे. त्यातूनच हे मन अध्यात्माची व विज्ञानवादाची हास्यास्पद सांगड घालू लागलं आहे. वैज्ञानिक उपकरणांची यथासांग पूजा करु लागलं आहे. विदेशी भूमीवर सुरू असलेला क्रिकेट सामना जिंकावा म्हणून येथे बसून यज्ञयाग करू लागलं आहे. कोरोना सारखी विश्वव्यापी महामारी नष्ट व्हावी म्हणून महामृत्युंजय जप करू लागलं आहे. कोरोना काळात देवाची व मंदिरांची विश्वासार्हता निकाली लागली असताना भव्य मंदिर निर्माण करू लागलं आहे.ग्रहशांती, वास्तुशास्त्र व राशीभविष्य अशा अंधश्रद्धा मूलक गोष्टींना खतपाणी घालू लागलं आहे. ज्योतिष्य नावाच्या थोतांडाला शास्त्राचा दर्जा देवून विद्यापीठ अभ्यासक्रमात लावू लागलं आहे. एकूणच ही आजारी मानसिकता आहे...

एकविसाव्या शतकातील गतिमानतेमुळे पायाभूत व अद्ययावत सुविधा खेड्यापाड्यात, डोंगरदऱ्यात व दुर्गम भागात अधिक प्राधान्याने पोहचू लागल्या आहेत. खेडे-पाडे रस्त्यांमुळे व आधुनिक संसाधनांद्वारे शहरांशी जोडले जात आहेत. विसाव्या शतकात जिल्ह्यांच्या ठिकाणी सुरू झालेल्या औद्योगिक वसाहतीत (एम.आय.डी.सी.) नवनवीन वस्तुंचे उत्पादन करणारे कारखाने सुरू होत आहेत. शेतीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाल्यामुळे पूर्वी ग्रामीण भागात प्रछन्न स्वरुपात असलेली बेकारी आता स्पष्ट स्वरुपात दिसू लागली आहे. त्यामुळे काहींनी गावातच छोटे-मोठे धंदे सुरू केले आहेत. काहींनी

शहराचा रस्ता धरला आहे. काही शेतकऱ्यांनी शेतीला शेतीपूरक व्यवसायाची जोड दिल्यामुळे नवा सधन शेतकरी वर्ग उदयास आला आहे. बहुसंख्य शेतकरी हा निर्धन व अल्पभूधारक आहे. तो अजूनही सहकारी बँकांकडून व सावकारांकडून घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली दबून चिंतातूर व भयग्रस्त जीणे जगतो आहे. तर, कुणी तणावाखाली आत्महत्या करतो आहे. अल्पभूधारक शेतकरी,शेतमजूर काबाडकष्ट करून, घाम गाळून जीवन जगतो आहे. शासकीय योजनांमुळे खेड्यापाड्यात पक्की घरे उभी राहू लागली आहेत. घराघरात दूरदर्शन आले आहे. दूरदर्शनवरील धार्मिक व पौराणिक मालिकांनी समाजाला पुन्हा अंधश्रद्धेच्या व अविवेकाच्या सनातन खाईत लोटणे सुरू केले आहे. दूरदर्शन लोकशिक्षणाचे व प्रबोधनाचे माध्यम बनण्याऐवजी श्रद्धाशिक्षणाचे आणि धार्मिक उन्मादाचे माध्यम बनले आहे. गावागावात वेगवेगळ्या सेना,संघ,दल, परिषदेच्या शाखा पोहोचल्या आहेत. धर्मभेद, जातिभेद कात टाकू लागला आहे. राजकीय पक्षांनी गावं ताब्यात घेतली आहेत. बेरोजगार तरुणांच्या खांद्यावर पक्षाचे झेंडे आले आहेत. शिक्षित तरुणांचा उपयोग राष्ट्रविकासाकरिता व्हायला हवा.परंतु तो पक्षविस्तारासाठी होवू लागला आहे. उच्चशिक्षित बेकारांचे तांडे व एकूणच शिक्षण क्षेत्राची दूरावस्था बघून येणाऱ्या पिढ्यांच्या मनात शिक्षणाविषयी अनास्था बळावू लागली आहे. सरकारी शाळा बंद करण्याची मोहीम जोरात सुरू आहे. दुसरीकडे उच्चवर्ण आणि वर्गातील मुलांकरिता खाजगीकरणाच्या नावावर भव्य, सुसज्ज व अद्ययावत शाळा सुरू होत आहेत. शेतकरी, कष्टकरी व शेतमजुरांचे जीवन असंख्य प्रश्नांनी घेरले जात आहे...

गाव-खेड्यातील बेरोजगारीला, दारिद्र्याला, काबाडकष्टाला आणि वाढत्या जातियतेला कंटाळून अनेक कुटुंबे शहराचा रस्ता धरु लागली आहेत. शहरात झोपडपट्टया वाढू लागल्या आहेत. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी सुखसुविधांचा व गुन्हेगारी नियंत्रणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात एका बाजूला सुस्थापित लोकांच्या देखण्या, सुसज्ज व बहुमजली इमारती उभ्या राहत आहेत. तर, दुसऱ्या बाजूला विस्थापित लोकांच्या बकाल, कंगाल व बेहाल झोपडपट्टया विस्तारत आहेत. ही आर्थिक व सामाजिक विषमतेची दरी दिवसेंदिवस रुंदावत चालली आहे. एका बाजूला सुखाचा वसंत फुलतो आहे. दुसऱ्या बाजूला दु:खाचा ग्रीष्म जाळतो आहे. शहरात बेकारांची, भिकाऱ्यांची संख्या बेसुमार वाढते आहे. अगतिक व निराधार महिलांना आधार देण्याऐवजी व्यवस्थाच त्यांना कुंटणखान्यात लोटते आहे. सुखवस्तुंच्या कॉलनीतील लाफिंग क्लबमधून हास्याचे फवारे उडत आहेत.तर, निर्धनांच्या वस्तीतील जगण्याचा आकांत मनाला अस्वस्थ करीत आहे. दारिद्र्य, महागाई, बेकारी, कुपोषण, उपासमार, आजार,शोषण,व्यसन अशा अनेक आपत्तींनी गरिबांचे जीवन ग्रासून टाकले आहे. सगळीकडून जगण्याची कोंडी झालेले हे जीव दररोज अनेक संकटांशी लढत जीवन जगत आहेत.

भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना सन्मानाने, समतेने व सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार बहाल केला आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारुन सर्वांच्या उन्नयनाची ग्वाही दिली आहे. वर्ण, पंथ, वंश आणि जाती विसर्जनाची भूमिका घेवून सामाजिक समतेचे उद्दिष्ट राज्यकर्त्यांपुढे ठेवले आहे. तसेच भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अंगिकारून राष्ट्रीय एकात्मतेचे बीज भारतभूमीत रुजविले आहे.परंतु काही विषमतावादी राजकीय पक्ष सुरुवातीपासूनच धर्मनिरपेक्षतेला छेद देत धर्माधिष्ठित राजकारणाची भारतीय समाजमनात विषपेरणी करीत आहेत . सनातन विचारांच्या अनेक संस्था, संघटना 'राष्ट्रीय'त्वाचा आव आणत वर्ण, जातिव्यवस्थेच्या रोगट विचारांना खतपाणी घालत आहेत. धर्माधिष्ठित राजकारण करणारे राजकीय पक्ष धार्मिक ध्रुवीकरणाचे विष पेरत धर्मनिरपेक्ष भारताच्या सत्तास्थानी आले आहेत. मनुप्रणित विषमतेचे पुनरुज्जीवन करण्याच्या विकृत ध्येयवादाने पछाडल्यामुळे भारतातील संवैधानिक व्यवस्थेला तडे जाऊ लागले आहेत. त्यामुळे तळागाळातील समाजघटकांच्या उत्कर्षाला खीळ बसली आहे. जातिभेदाला पुनर्जीवित करणाऱ्या व धार्मिक विद्वेषाची आग भडकविणाऱ्या सरकारी धोरणांमुळे खेड्यापाड्यात जातिभेदाच्या झळा तीव्र होवू लागल्या आहेत. पांढरपेशा मनातील शहरी जातिवाद कुत्सित स्वरुपात घायाळ करू लागला आहे. संवैधानिक मूल्यांच्या बळावर आधुनिकतेकडे झेपावणारा भारत पुन्हा जाती, धर्माच्या दलदलीत फसतो की काय? अशी अवस्था निर्माण झाली आहे.

भारतातील एकोणिसावे शतक हे धर्मचिकित्सेचे शतक म्हणून ओळखले जाते. इंग्रजी राजवटीतील या धर्मचिकित्सेने धर्मव्यवस्थेचा प्रभाव झपाट्याने ओसरु लागला. विसावे शतक समाज प्रबोधनाच्या चळवळींनी गजबजून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर हिंदू

धर्माचा त्याग करून आणि बौद्ध धम्माचा स्वीकार करून या विसाव्या शतकाला प्रबोधनाचे आणि समाजक्रांतीचे शतक अशी ओळख दिली. भारतीय संविधानाने हे समाजक्रांतीचे शतक अधिक गतिमान केले. संवैधानिक अधिकारांमुळे तळागाळातील समाजघटक वर आले. प्रतिष्ठेने, सन्मानाने व स्वाभिमानाने जगू लागले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत बुद्धिमत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर आपले अस्तित्व सिद्ध करू लागले. धर्मव्यवस्थेला हे नवे आव्हान वाटू लागले. त्यामुळे धर्मव्यवस्थेने व धर्मव्यवस्थेच्या रक्षकांनी देशात धार्मिक उन्माद वाढविणे सुरू केले. भारतीय समाजाचे धार्मिक ध्रुवीकरण करून विषमतेचे समर्थक सत्तास्थानी आले. आणि एकविसाव्या शतकातील समतापर्वाला विषमतावादी धर्मांधतेचे ग्रहण लागले. समाजमनात धार्मिक विद्वेषाची व जातिभेदाची आग भडकविणे सुरू झाले आहे. असहिष्णुता मोकाट सुटली आहे. झुंडशाही बळावली आहे. देशात अचानक मॉबलिंचिंगच्या घटना घडू लागल्या आहेत. ऑनरकिलिंगच्या घटनांनी पुन्हा जातीय भिंती उभ्या केल्या आहेत. जातीय बहिष्कार वाढले आहेत. सामुहिक छळ करणे,अपमानित करणे,धिंड काढणे, पाशवी बलात्कार करणे, मारझोड करणे, निघृण खून करणे हे अमानुष प्रकार वाढीस लागले आहेत. सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या प्रतिमा, प्रतिकांची विटंबना करणे, राष्ट्रपुरुषांची निंदा-नालस्ती, बदनामी करणे. आणि टिकाकारांना व मारेकऱ्यांना सन्मानित करणे सुरू आहे. सत्य सांगणाऱ्यांना व संविधान समर्थकांना राष्ट्रद्रोही ठरविले जात आहे. पुरोगामी चळवळीतील विचारवंतांवर व बुद्धिवंतांवर राष्ट्रद्रोहाचे खटले भरले जात आहेत. समाजाला विवेकवादाची, वैज्ञानिक दृष्टीची व सत्यनिष्ठेची दिशा दाखविणाऱ्यांच्या मारेकऱ्यांद्वारे हत्या केल्या जात आहेत. अभ्यासू व सजग मनाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रद्रोही ठरविण्यात येत आहे. सी.ए.ए., एन.पी.आर. आणि एन.आर.सी. ची भीती दाखवून सर्वसामान्यांचे नागरिकत्व धोक्यात आणण्याचे प्रयत्न केले जात आहे. नोटबंदीचा सर्वाधिक फटका सर्वसामान्यांनाच बसला आहे. खाजगीकरणामुळे अनेकांना बेरोजगार व्हावे लागत आहे. उच्चशिक्षित तरुणांच्या शासकीय सेवेच्या संधी हिरावल्या गेल्या आहेत. कामगार विरोधी कायदे अंमलात आणले जात आहेत. नवीन कृषी कायद्याद्वारे शेतकऱ्यांची कोंडी करण्यात येत आहे. शेतकरी आंदोलन हुकुमशाही पद्धतीने दडपले जात आहे. मूलभूत अधिकारांसाठी आवाज उठविणाऱ्यांची 'आंदोलनजिवी ' म्हणून खिल्ली उडवली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून सर्वसामान्यांवर शिक्षणबंदी लादण्यात येत आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होवू आहे.संसदेपासून हाकेच्या अंतरावर भारतीय संविधान जाळले जात आहे. प्रसारमाध्यमांवर ताबा मिळवून लोकांपासून सत्य दडवले जात आहे. खोटं बोलणे हा राष्ट्रधर्म होवू पाहतो आहे. राजकीय हुकुमशाही डोके वर काढू लागली आहे...

# त्यातच संपूर्ण जगावर कोरोना विषाणूचे महासंकट आले आहे. गतिमान जग अचानक ठप्प झाले आहे. जगातील लाखो लोकांचे जीवन कोरोनाने आकस्मिकपणे संपविले आहे. कोरोनाने मानवी जीवनाची क्षणभंगुरता भयावह पद्धतीने अधोरेखित केली आहे. कोरोनाची झळ संपूर्ण जगाला बसली हे खरे असले तरी बहुतेक सर्व राष्ट्रांनी हे महासंकट राष्ट्रीय आपत्ती म्हणून परस्पर सहकार्याने, जबाबदारीने व संवेदनशीलतेने हाताळले आहे. आपल्या संवेदनाहीन सरकारने मात्र स्वतःची जबाबदारी झटकून नागरिकांना आत्मनिर्भरतेच्या वाऱ्यावर सोडले आहे. आरोग्य सुविधेअभावी झालेले लाखो मृत्यू या सरकारी हत्याच ठरल्या आहेत. गैरसोयींमुळे हजारो मृतदेह गंगेच्या पात्रात सोडण्यात आले. या अभूतपूर्व घटनेची एकविसाव्या शतकाने भारताच्या इतिहासात नोंद केली आहे...

एकोणिसाव्या शतकापासून आकारास आलेल्या आधुनिक मराठी साहित्याने समाजजीवनातील स्थिती-गतीच्या, चढ-उतारांच्या व वाटा-वळणांच्या नोंदी साहित्याच्या विविध प्रकारातून आविष्कृत केल्या आहेत. समाजमनाच्या सुख-दुःखांची, ध्येय-स्वप्नांची, व्यथा-वेदनांची सूक्ष्म स्पंदने मराठी साहित्याने वेगवेगळ्या वाङ्‌मय प्रकारातून अतिशय प्रभावीपणे टिपली आहेत. व्यापक, वास्तवदर्शी व क्रांतिकारी भूमिकेतून मराठी साहित्यात आंबेडकरवादी साहित्य प्रवाहाचा उदय झाला आहे. आंबेडकरवादी साहित्य प्रवाहाचा आदर्श नजरेपुढे ठेवूनच मराठीत आधुनिक ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, कामगार साहित्य असे छोटे-मोठे साहित्य प्रवाह अस्तित्वात आले आहेत. या विविध साहित्य प्रवाहांनी समाजजीवनातील दुःखांना, व्यथा, वेदनांना, शोषणाला, अन्यायाला, नाना समस्यांना व प्रश्नांना वाचा फोडली आहे. शोषित,पीडितांचा, उपेक्षित, वंचितांचा दबलेला आवाज साहित्यातून मुखरीत

केला आहे. आंबेडकरवादी साहित्याने तर, एकूणच भारतीय साहित्य विश्वाला समाजक्रांतीची नवी दिशा दिली आहे.

एकविसाव्या शतकाने भारतीय साहित्य विश्वावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे. संविधानाच्या लख्ख प्रकाशात आधुनिकतेच्या दिशेने निघालेल्या भारताने पुन्हा धर्मांधतेच्या अंधारवाटेवर पाऊल टाकले आहे. संवैधानिक मूल्यांना छेद देवून मनुवादी विषमतेचा काळोख पुन्हा अक्राळविक्राळ रूप धारण करू लागला आहे. धर्मद्वेषाच्या व जातिभेदाच्या जुन्याच आजाराने पुन्हा उचल खाल्ली आहे. धर्मसत्तेच्या व राजसत्तेच्या एकीकरणातून नवी भांडवलवादी अर्थव्यवस्था आकार घेऊ लागली आहे. सर्वसामान्य नागरिक सर्वंकष शोषणाचा बळी ठरु लागला आहे. भेदभाव, शोषण,अन्याय, अत्याचाराच्या घटनांमध्ये गुणोत्तर पद्धतीने वाढ होवू लागली आहे. न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता घसरणीला लागली आहे. भारताच्या संवैधानिक संस्थांचे अधिकार हिरावून लोकशाही संरचनेला खिळखिळे केले जात आहे. लोकसंसदेला निष्प्रभ करून धर्मसंसद स्थापण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील राजकीय नेतृत्वाने भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने उभी केली आहेत. भारतीय समाजजीवन असंख्य प्रश्नांची उगमभूमी ठरू लागले आहे... अशावेळी साहित्याची व साहित्यिकांची जबाबदारी शतपटीने वाढली आहे. मराठी साहित्याला तर, महात्मा ज्योतिबा फुले, गो. ग. आगरकर, लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा थोर विचारवंतांचा व समाजचिंतकांचा समृद्ध वारसा लाभला आहे. या बुद्धिवंतांनी भारतीय समाजाला समतेची व समाजक्रांतीची दिशा दाखविली आहे. महाराष्ट्र नेहमी वैचारिक क्रांतीच्या क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे. सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीत महाराष्ट्राने सदैव भारताचे नेतृत्व केले आहे. त्यामुळेच मराठी साहित्याकडून व साहित्यिकांकडून अशा विपरीत परिस्थितीत जास्त अपेक्षा आहेत.

मराठी प्रतिभांनी पुरस्काराची अथवा तीरस्काराची पर्वा न करता जळत्या वास्तवाला भिडलं पाहिजे. सत्तेला प्रश्नांच्या खिंडीत पकडलं पाहिजे. लोककल्याणकारी विरोधी प्रवृत्तीवर विचारांचा अचूक मारा केला पाहिजे. तळागाळातील दीन-दु:खितांचे प्रश्न सोडविण्यासाठी मराठी प्रज्ञा-प्रतिभांनी आपल्या लेखण्या झिजविल्या पाहिजे. शोषित, पीडित, उपेक्षित, वंचितांच्या पाठिमागे आपल्या शब्दांचे बळ उभे केले पाहिजे. भारत आणि भारतीय संविधानाप्रती आपली प्रतिबद्धता जाहीर केली पाहिजे. मराठी साहित्यिकांनी आपल्या कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललित निबंध, वैचारिक निबंध इत्यादी लेखन प्रकारातून संवैधानिक मूल्यांचा जागर केला पाहिजे. एकंदरीत एकविसाव्या शतकातील समस्याप्रधान भारताने मोठ्या विश्वासाने सोपविलेली जबाबदारी मराठी साहित्याने समर्थपणे पेलली पाहिजे आणि भारतीय लोकशाहीला बलशाली केले पाहिजे. यातच समाजाचे, राष्ट्राचे आणि साहित्याचेही हीत सामावले आहे...!